**नि.फौ.ख.क्र. ४३/२००८**

शासन वि. रफिक इनामदार.

नि.क्र.७२

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१</u>**

**आरोपी क्रं. ३ विरुध्द फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे त्याच्या अनुपस्थीतीत,**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

**नाव : राजेंद्र रामचंद्र जाधव,**

आधार क्र. ९८३२८२३३३१२७४

वय : ४९ वर्षे, व्यवसाय: नोकरी,

रा. मलकापुर, ता.कराड, जि. सातारा.

**<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती.अहिवळे यांचे मार्फत–</u>**

०१. पोलिसांनी मला संगणक व त्यासंदर्भात उपकरणांचा जप्ती पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून पोलीस ठाणे कराड शहर येथे बोलाविले होते,असे काही घडले नाही. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी दि.१३/१२/२००७ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही.

<u>सरतपास पुर्ण</u>.

<u>सरकारी वकीलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ च्या अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.</u>

**<u>उलटतपास सरकारी वकीलांतर्फे –</u>**

२. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी मला संगणक व त्यासंदर्भात उपकरणांचा जप्ती पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून पोलीस ठाणे कराड शहर येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या समक्ष सदर पंचनामा तयार करुन तो मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने मी त्यांना वाचवण्याकरिता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास सरकारी वकिलांतर्फे पुर्ण.</u>

**<u>आरोपी क्रं १ व २ तसेच त्यांचे विद्वान विधीज्ञ यांचा पुकारा केला असता ११.३० वाजणेच्या सुमारास आरोपी क्रं. १ व २ हे उपस्थित असुन त्यांनी उलटतपास घेणेस असमर्थाता दर्शविली. संबधित आरोंपीनी सांगितले की त्यांचे विव्दान विधीज्ञ आज रोजी न्यायालयात येणार नसुन त्यांचे क.सहाय्यक मुदत वाढ अर्ज देणार आहेत. अदयाप मुदतवाढ अर्ज अभिलेखावर दाखल नाही तसेच आरोपी क्रं. ३ फरार आहे</u>**

**त्यामुळे आरोपी क्रं. १ ते ३ तर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

दि. ०३/०२/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
**(कोर्ट क्र.०५)**